# मुंगशा



प्रकाशक
**श्री भगवान मुंगसाजी संस्थान**
मुख्य दरबार धामणगांव (देव) र.नं. अे.७२३
अध्यक्ष – **श्री हरीभाऊ अंबादास अंभोरे**

लेखक – **श्री गजानन भोपाजी अंभोरे**
(शिक्षक, नगर परिषद, पुसद)

# प्रस्तावना

वयाच्या पस्तीसाव्या वर्षी लोकांच्या त्रासाला कंटाळून वैराग्यमुर्ती तुळजाजीने स्वत:ला गावातील बुरूजामधील शांत व निरव परंतु अंधार व सापाचे साम्राज्य असलेल्या जागी स्वत:ला – बंदिस्त करून घेतले. आईच्या स्वप्नात जावून आपला ठाव ठिकाना दिल्यानंतर आईने काही निवडक लोकांसह बुरुजात प्रवेश केला तेंव्हा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला ध्यानस्थ बसलेल्या तुळजाजीच्या अंगावर मुंगुस आणि साप खेळत होते म्हणुन बारा वर्षाच्या तपानंतर जेव्हा भगवंतानी डोळे उघडले तेंव्हा भाविक भक्तांनी बेधुंद होवून मुंगसाजी महाराज की जय असा जयघोष केला गमाईने भगवंताला हदयाशी कवटाळले आणि आनंदातिरेकाने तिच्या ओठातुन शब्द बाहेर पडले.

## ‘‘माझा मुंगशा, माझा मुंगशा’’

या पुस्तकातील संपुर्ण माहिती महात्मा मुंगसाजी महाराज यांच्या वंशातील भगवंताचा सहवास लाभलेले वयोवृध्द परमभक्त श्री भोपाजी गणूजी अंभोरे (प्रवर्तक) रा. धामणगांव (देव) यांनी दिली आहे. भगवंताच्या प्रेरणेने पुस्तक लिहले आहे.

# पावन तिर्थक्षेत्र धामणगांव (देव)

यवतमाळ जिल्हात दारव्हा तालुक्यातील धामणगांव (देव) तिर्थक्षेत्र श्री मुंगसाजी भगवंताच्या चमत्कारांनी अगदी स्वर्गमय झाले आहे. धामणगांव (देव) ही भुमीच फार पूर्वी पासुन राम, कृष्ण पुंडलीक बाबा, संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज यांच्या चरण स्पर्शानि पावन झाली आहे. आदिमाता तुळजा भवानीचा तर या भूमीला आशिर्वादच आहे. अशा पावन भुमीला साक्षात विष्णुचा अवतार श्री. मुंगसाजी भगवंतानी जन्म घेवुन तर धन्य केल आहे.

देवाच्या जन्मा अगोदरच ही भूमी धनधान्य तसेच सर्वच बाबतीत समृध्द होती. येथील वातावरण आनंदमय आणि सुंदरमय होते . त्यात श्री मुंगसाजी भगवंताच्या गोड अमृतवाणीने स्वर्गमय झाली. अशा या भूमीत सर्वत्र धनधान्य लक्ष्मी नांदायची.

येथील भाविक लोकांच वैभव त्यांची अगाध भक्ती हेच होतं. देवीच्या दर्शनाला येणार्या भाविक भक्तांची सेवा गावकरी भक्तांनी अपार श्रध्देने केली. आणि आजही हे सेकवेच व्रत तेवढयाच तन्मयतेने येथील भाविक भक्त अखंडपणे चालवंत आहेत.

देवाच्या भक्तांना कोणताही त्रास होवू नये म्हणुन येथील भक्त खबरदारी घेत. उन्हाळयामध्ये जेव्हा गावात पाणी नसायचे

तेंव्हा पाण्याची सोय करून देण्यासाठी खरखत्या उन्हात चार– चार मैलावरून पाणी आणत. त्यांच्या भक्तीचा हा उत्कृष्ठ दाखलाचे म्हणावा लागेल.

धामणगांव (देव) हे तिर्थक्षेत्र जरी लहानशा गावात असेले तरी इतर तिर्थक्षेत्रापेक्षा आगळे – वेगळेच आहे. भक्तांची सर्व इच्छा पूर्ण करणारे आणि मनाला शांती देणारे हे तिर्थक्षेत्र मुंगसाजी महाराजांच्या चमत्कारांनी आणि तुळजापूरच्या भवानी आईच्या आशिर्वादाने उदयास आले.

भोपाजी आणि साखराआई हे अंभोरे दांपत्य भवानी आईचे महान भक्त होते. भवानीमाता त्यांचे श्रध्दा स्थान होते.

भोपाजी व साखरा आईची देवावरील श्रध्दा अपरंपार होती. पुत्रप्राप्ती साठी ह्या जोडप्यांनी देवीची मनोभावे आराधना केली. त्यांच्या या अलोट भक्तीमुळे त्यांना देविचा साक्षात्कार झाला त्यांना त्यांच्या पुत्राच्शा पोटी साक्षात विष्णु अवतार घेईल असे वचन मातेने दिले तेंव्हापासुनच भगवंताचे अस्तीत्व धामणगांव (देव) नगरीत जाणवायला लागले. धन्य ते भोपाजी आणि साखराआई यांची थोर पुण्याई की देवाला प्रत्यक्ष अवतार घ्यावा लागला.

धन्यते तिर्थक्षेत्र धामणगांव ।<br>
भगवंतीचे असे साक्षात जिथे ठाव ।।



मुंगश्या...

# पवित्र ते कुळ

ज्या कुळात साक्षात भगवंत जन्म घेतील ते कुळ तो देश ती भूमी पावन होते. अशा या पुण्यवान भारत भुमिवर महाराष्ट्र राज्यात यवतमाळ जिल्ह्यात दारव्हा तालुक्यात धामणगांव नगरीत सुख समाधान आणि साक्षात लक्ष्मी ज्यांच्या घरी वास करीत होती. असे पूर्ण्यकर्मी , सत्वशील भोपाजी अंभोरे आणि साखराआई या आंध कुटूंबाचा असाच उध्दार झाला.

भोपाजी आणि साखराआई यांना एकही संतान नव्हती . ह्या गोष्टीचे त्यांना खुप वाईट वाटायचे. परंतु आपलं दुःख ते कोणाजवळ बोलून दाखवत नसत. ते आपलं गाऱ्हाण फक्त तुळजापुरच्या तुळजा भवानी आईचे जवळ मांडत असत कारण हे कुटूंब भवानी आइचे अगाद भक्त होते. ते भवानी आईची नित्य नेमाने मनोभावे पुजा अर्चा करीत असत. अशा या लाडक्या भक्तांची हाक भवानी आईने ऐकली सुवासिनीच्या रूपात प्रत्यक्ष भवानी आईने साखरा आईला दर्शन दिले. पुत्र प्राप्ती साठी प्रतिक्षा करण्यास सांगीतले परंतु साखरा आईचा धिर सुटलेला होता. मुलासाठी प्रतिक्षा करणे तिला अशक्य होते. ती आक्रोश करू लागली. भक्ताचे दुःख दुर करणे मातेचे परम कर्तव्य म्हणुन तुझ्या मुलाच्या पोरटी साक्षात विष्णु भगवान अवतार घेईल असे वचन दिले आणि भवानी माता क्षणार्धात अदृश्य झाली.

आईने आपल्याला प्रत्यक्ष दर्शन देवून पुत्र प्राप्तीचे वचन दिले म्हणुन साखराआईला खुप आनंद झाला. ती मोठमोठयाने हसु लागली. नंतर तिने आपले पती भोपाजी यांना घडलेला सर्व चमत्कार सांगीतला त्यानंतर दोघेही संसारात रममान झाले. थोडयाच दिवसात देवीच्या आशिर्वादाने साखराआई गर्भवती राहील्या भोपाजीला फार आनंद झाला. त्यांची दानशुर वृत्ती जागृत झाली. घराला वारस मिळणार या भावनेने त्यांनी दानधर्म करण्यास सुरूवात केली. साखराआईचे दिवस भरले त्यांनी एक छान मुलाला जन्म दिला. त्यांनी आपल्यामुलाचे नांव विक्रमजी असे ठेवले. दिवसा मागुन दिवस जात होते. विक्रमजी मोठा झाला. त्याचे दोनाचे चार हात करण्याचे आई वडिलांनी ठरविले आणि त्यांचा विवाह गमाई नावाच्या सुंदर, रूपवान कन्येशी झाला. विवाहानंतर थोडयाच दिवसात त्यांच्या वडीलांचा स्वर्गवास झाला ओघानेच घराची जबाबदारी विक्रमजीवर पडली. पतीच्या मृत्युनंतर साखराआई सुध्दा आजारी पडल्या. पति वियोगाचे त्यांना फार दु:ख झाले. भवानी आईच्या वचनाची पुर्तता झालेली पहायच भाग्य त्यांना लाभलं नाही.

आजारी असतांना आपल्या सुनेला जवळ बोलावून तिला तिच्या पोटी भगवान विष्णु अवतार घेणार हे भवानी देवीचे आपल्याला असलेली वचन सांगीतले आणि त्यांनी या जगाचा

निरोप घेतला. आणि विक्रमजीचा मोठा आधार गेला. दुःखाचा त्यांच्यावर डोंगर कोसळला . त्यात आणखी भर म्हणुन की काय लग्नाला तीन वर्ष होवूनही त्यांना मुलबाळ झाले नाही.

आईवडीलांचा वारसा मात्र विक्रमजी व त्यांची पत्नी गमाईने सुध्दा चालु ठेवला. देवीची आराधना तेही नित्यनेमाने करत असतं देवीची भक्ती करत असतांना अचानक एक दिवस चमत्कार झाला. देवीने गामाईला पुष्प दिले. त्यानंतर थोडयाच दिवसात तुळजा भवानीच्या प्रसादाने गमाई गर्भवती राहील्या त्यांच्या संसाररूपी दुःख सागरामध्ये पुत्र सुखाचे कमळ उमलले. या क्षणाने त्यांचे जीवनाचे नंदनवन फुलून गेले. त्याच्याघरी एक चिमुकला पाहूणा आला. विक्रमजीला पुत्ररत्न प्राप्त झाले. तो दिवस होता जन्माष्टमीचा शुक्रवार पाच सप्टेंबर अठराशे त्रेसष्ट.

बाळ बारा दिवसाचे झाले . नाम करण सोहळयाचा दिवस आला. सगळीकडे आनंदी आनंद होता . बारशाचा सोहळा मोठया थाटामाटात साजरा केला. त्याचवेळी म्हातारीच्या रूपात येवून साक्षात भवानी आईने बाळाचे नांव तुळजाजी असे ठेवले. आणि म्हातारी अदृष्य झाली. त्यानंतर विक्रमजीला अर्जुनजी, चिमणाबाई, वालंबाबाई, बयनाबाई अशी आणखी चार मुलं झाली. तुळजाजी दिवसें दिवस जसा वाढत होता, तसतसा त्याच्या वागण्यात फरक जाणवायला लागला. तुळजाजीच्या विचीत्र

वागणुकीमुळे विक्रमजी आणि गमाईला आपल्या आईने सांगीतलेल्या देवीच्या वचनाची सत्यता त्यांना जाणवायला लागली आणि तुळजाजीच्या रूपाने साक्षात दैवाने जन्म घेतला याची त्यांना खात्री पटली. आई वडील आणि त्यांची सर्व मुले तुळजाजीची सेवा करायला लागले. आई गमाई तुळजाजीला अत्यंत जपायची त्यांची काळजी घ्यायची आपल्या पोटी देवाने जन्म घेतल्यामुळे स्वत:ला धन्य समजायची देवाचा भाऊ अर्जुनजी सुध्दा तेवढयाच तन्मयतेने तुळजाजीची सेवा करायचा. परंतु गावातील लोक मात्र तुळजाजीला वेडा समजायचे ऐतखाऊ म्हणुन हिनवायचे. गमाईला मात्र तुळजाजीची सतत काळजी वाटायची.

आईच्या आज्ञेचे पालन म्हणुन तुळजाजीने लग्न केले. परंतु त्यांचे संसारात लक्ष मुळीच नव्हते. त्यानंतर अर्जुनजीचा विवाह भुलाबाईशी झाला. ह्या दोघांनी मात्र तुळजाजीला अंतर दिले नाही. अर्जुनजी आणि भुलाबाई त्यांचा काळजीपूर्वक सांभाळ करीत होते. त्यांना कोणत्याही गोष्टीची कमी पडू देत नसे. आपल्या हृदय सिंहासनावर बसवून अर्जुनजी आणि भुलाबाई या जोडप्याने आयुष्यभर त्यांची सेवा केली.

अर्जुनजीला गणुजी, जाणुजी, नारायणजी अशी तिन मुले झाली. त्यांचा वंशवाढू लागला अशा अंभोरे वंशाचा उध्दार करण्यासाठी श्री मुंगसाजी माऊलीने धामणगांवी जन्म घेवून त्या भुमीला पावन केले.

# चमत्कारीक तुळजाजी

दिवसामागुन दिवस जाऊ लागले . तुळजाजी चौदा वर्षाचा झाला. सधन अंभोरे घराण्याला विक्रमजीच्या दानधर्म वृत्तीमुळे अवकाळा आली. विक्रमजी आता आपल्या कुटूंबाचा विचार करू लागले. मुलाने काही तरी कामधंदा करावा असे विक्रमजीला वाटू लागले. परंतु देव समजुन तुळजाजीला कोणीही काम सांगत नव्हते. परंतु तुळजाजीने वडीलाच्या मनाची घालमेल ओळखली आणि गायी राखण्याचे काम स्वतःहून स्विकारले. वडीलांनी त्याला एक खंडी गायी राखण्याचे काम दिले. तो गायी चारण्यासाठी आपल्या सवंगडयासोबत जवळच्या डोंगरावर जात असे तुळजाजी एका ठिकाणी बसायचा आणि संपुर्ण गायी तुळजाजीच्या आसपासच चरायच्या त्यांचे पाय चाटायच्या. देवाचे दर्शन घ्यायच्या हे चमत्कार त्यांचे सवंगडी प्रत्यक्ष डोळयांनी पहायचे त्यांचे कौतुक करायचे. त्यांचे चमत्कार घरी आपल्या आई वडीलांना सांगायचे परंतु लोक त्यांच्यावर विश्वास ठेवत नसे.

एकदा तुळजाजी आणि इतर सवंगडी गोपाल काला करत होते त्याचवेळी चार पाच गायी भरल्या पिकामध्ये गेल्या राखणदाराने गायी कोंडवाडयाकडे हाकलत नेवू लागला मुले घाबरली. त्यांना काही सुचेनासे झाले . तुळजाजी मात्र शांत होता. त्याने सर्वांना गोपाल काला खाल्ल्याबरोबर काय आश्चर्य गायी व

राखणदार जागीच थांबले अचानक राखनदाराने गायी तुळजाजी जवळ आणून सोडल्या. त्याच्या पायी लोळण घेवून क्षमा याचना केली. तुळजाजीच्या स्पर्शाने राखणदाराचे दुखणे थांबले. या घटनेमुळे लोकांनात्याच्या देवपणाची जाण झाली.

तुळजाजी असेच एका मागुण एक चमत्कार सवंगडयांना दाखवत असत. त्यांच्या सवंगडयांनी त्याला देव मानले. गावात सुध्दा या गोष्टीची चर्चा होवू लागली. लोकांमध्ये कुजबूज आणि कुतूहल वाढले. तुळजाजीचे चमत्कार वाढतच राहिले. असेच एकदा तो आपल्या सवंगड्यासोबत नदीवर गेला. सर्व सवंगडी पोहण्यासाठी पाण्यात उतरली. तुळजाजी मात्र पोहता येत नसल्यामुळे काठावर बसले परंतु सवंगडयाने त्याला जबरदस्तीने पाण्यात ढकलले. तुळजाजी पाण्याच्या तळाशी जावून बसले. सर्व मुले त्यांची वर येण्याची वाट पाहू लागले. बराच वेळ होवून ही तुळजाजी वर आला- नाही. मुले घाबरली सगळयांनी पाण्यामध्ये उडया घेवून शोध घेतला परंतु तुळजाजी कुणालाही सापडले नाही. शेवटी मुले नदीकाठावर उभे राहून हाका मारू लागले. आणा भाका घालू लागले पण तुळजाजीचा पत्ताच नाही. शेवटी मुलांनी त्याला त्यांच्या आईची शपथ घातली . त्यासरसी तुळजाजी पाण्याच्या वर आला. आणि म्हणुन मी वर आलो अन्यथा मी पाण्यातचे राहत होतो सर्व मुलांनी तुळजाजीची क्षमा मागीतली आणि घरी चालण्यास विनंती केली.

हा चमत्कार साऱ्या गावभर पसरला तरीही लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. तुळजाजीला त्यांनी वेडयात काढले.

अशा प्रकारचे चमत्कार तुळजाजी आपल्या आईला सुध्दा दाखवायचा. आई अपल्या मुलाचा चमत्कार लोकांना सांगायची परंतु लोक तिच्या बोलण्याकडे लक्ष्य द्यायचे नाहीत. तर उलट तिही तिच्या मुलासारखी वेडी आहे असे म्हणत. काही लोक तर तुळजाजीला खुप त्रास देत. ऐतखाऊ म्हणुन हिणवत. त्याच्या आईला या गोष्टीचे वाईट वाटे. त्याचा भाऊ अर्जुनरजी मात्र तुळजाजीची मनोभावे सेवा करत. त्याला आपल्या सोबत ठेवत. त्याची देखभाल करत. त्याला जेवण दिल्या नंतर स्वत: जेवण करतं. आई व अर्जुनजीला सतत त्याची काळजी असतं.

## विवाह आणि वैराग्य

तुळजाजी आता पंधरा वर्षाचा झाला. आईने त्याला जिवापाड जपले. लहानाचे मोठे केले. आता त्यांचा विवाह करावा असे वाटू लागले. ह्याबाबात आपला मुलगा अर्जुनजीशी चर्चा केली. तुळजाजीचा विवाह करावा असे सांगीतले. आईची आज्ञा मोडू नये म्हणुन तुळजाजी विवाहासाठी तयार झाला. त्यांचा विवाह वरोलीच्या झामराबाईशी झाला. परंतु तुळजाजीचे लक्ष संसारात बिल्कूल नव्हते केवुळ आईच्या आज्ञेचे पालन म्हणुन तुळजाजीने विवाह केला. मात्र ही गोष्ट झामराबाईला रूचली नाही. तुळजाजीच्या विचीत्र वागण्याला झामराबाई कंटाळली आणि तिने

तुळजाजीच्या आईला सांगीतले तुमच्या मुलाचे संसारात मुळीच लक्ष नाही. मी एक क्षण सुध्दा इथे थांबणार नाही. गमाईला या गोष्टीचे फार दु:ख झाले. तिने आपल्या सुनेची समजुत काढण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु ती समजायला तयार नव्हती आपल्या मुलाचा संसार उध्दवस्त होणारया कल्पनेने त्यांच हृदय हेलावत हयाबाबत तीने आपला मुलगा तुळजाजीला सुध्दा समजावलं. परंतु तुळजाजीने एका शब्दात सांगीतले. ती राहत असेल तर राहू द्या जात असेंल तर जाऊ द्या. सगळयांचा नाईलाज झाला. झामराबाई कधीही सासरी परत न येण्याकरीता माहेरी निघून गेली सगळयांना ह्या गोष्टीचे दु:ख झाले.

साध्या, भोळया निरागस जीवन जगणाऱ्या तुळजाजीचा संसार ती मांडू शकली नाही. त्याचे देवपण ती सुध्दा ओळखु शकली नाही. आणि संसारीक सुखाच्या नादात मात्र स्वर्गीय सुखास मुकली. त्यानंतर मात्र तीनच महीन्यात तिला स्वर्गवास झाला. त्यानंतर अर्जुनजीचा विवाह भुलाबाईशी झाला. घरावरची संपुर्ण जबाबदारी अर्जुनजीवर सोपवून गमाईने तुळजाजीची सर्वस्वी ज़बाबदारी घेतली. त्याला वेळेवर आंघोळ जेवण देणे. हया सर्व गोष्टी करू लागली. गमाई शिवाय हया गोष्टी तुळजाजी कोणालाही करू देत नसे अर्जुनजी सुध्दा त्याची अत्यंत काळजी घेत त्याला काय हवं काय नको त्याची खबरदारी घेत . तुळजाजीच सुध्दा भावावर खुप प्रेम होत. भावाच्या मनाप्रमाणे तुळजाजी वागत असे.

# तुळजाजी झाला मुंगसाजी

तुळजाजी पस्तीस वर्षाचा झाला. तरीही गावातील लोकांकडून त्याची उपेक्षा आणि छळ चालूच होता. वेडा पिसा म्हणुन लोक त्याची निर्भत्सना करीत. ऐतखाऊ म्हणुन त्याला कोणीही बरं पाहत नसे. मात्र गमाईचा सारा जीव तुळजाजीत होता तो जिथे असेल तिथे त्याच्यासाठी जेवण पाणी घेवून जायची. गावातील लोकांच्या त्रासामुळे तो राना वनातभटकत असे आईला मात्र सतत काळजी लागलेली असायची. टाकीचे घाव शोसल्याशिवाय देवपण येत नसते हे सत्य तुळजाजीच्या बाबतीत तंतोतंत लागू पडले. सर्व गावातील लोकांनी तुळजाजीला वेडा म्हटले परंतु त्यांच्या वंशातील सर्वजन मात्र त्याला देव मानीत कारण तुळजाभवानीचे वचन आपल्या वंशाला आहे. याची सर्वांना जाण होती. ते सत्यच होईल याची सुध्दा खात्री होती. तुळजाजीच्या रूपाने आपल्या घरी भगवंत आला आहे. हे त्याच्या चमत्कारावरून सर्वानाच जाणवायचे. ते मात्र आईला चमत्कार दाखवायाचे. आईमनोमन आनंदून जायची. लोकांना सांगायची आपल्या गावात साक्षात भगवान विष्णु अवतरले आहे. तुम्ही देवाला जाणून घ्या. पण देवाचा चमत्कार पाहण्यासाठी भाग्यच लागतं. हे भाग्य कोणालाही लाभले नाही. गमाई त्यांना जीव तोडून सांगायची मात्र तिच्या कडे कोणीही लक्ष द्यायचे नाही. तिच्या मुलाप्रमाणे तिही वेडी झाली असेच लोक म्हणत. गमाईला मात्र

तुळजाजीत भगवंताचे रूप दिसले. त्यामुळे तिने तुळजाजीकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. देव सगळयांना एक दिवस जरूर चमत्कार दाखवेल याची आशा सोडली नाही. त्यांच संपुर्ण कुटूंब देवाची मनोभावे सेवा करत. त्यांची काळजी घ्यायचे. तुळजाजीने बालपणापासुन वयाच्या पस्तीस वर्षापर्यंत सवंगडयाना आणि गावातील लोकांना अनेक चमत्कार दाखविले.

एक दिवस वैराग्य वृत्तीने गावात फिरत असतांना एका बुरूजामध्ये खूपखोल अशा पोकळी मध्ये ज्या ठिकाणी केवळ अंधार आणि सापाचा साम्राज्य आहे. अशा निरव आणि शांतमय जागी तुळजाजीने तपश्चर्या सुरू केली. तीन– चार दिवस झाल्यावर त्याची आई गमाईला तिच्या देवाची चिंता वाटू लागली आपल्या देवाला शोधण्यासाठी आजुबाजूचा सारा परिसर पिंजून काढला. शोध करून थकले . परंतु तुळजाजीचा कुठेही शोध लागला नाही. सर्वच जन चिंताग्रस्त झाले. त्यांना अन्न पाणी गोड लागेनांस झाल. शेवटी देवाला त्यांची दया आली. आईच्या स्वप्नात जाऊन त्यांनी स्वत:चा ठावठिकाणा सांगीतलं. त्यांना शोधण्यासाठी त्यांची आई लोकांना विनंती करू लागली. तुळजाजीला बुरूजाच्या बाहेर आणण्यास मदत करण्यास सांगू लागली परंतु कोणीही त्या अंधार कोठडीत जायला तयार झाला नाही. शेवटी गमाईने आपल्या विस वर्षाच्या अर्जुनजीला घेवून बुरूजामध्ये प्रवेशकेला बुरूजामध्ये सर्वत्र अंधार संचारला होता. दोघांनाही तुळजाजी कुठेही दिसेना तेत्याला हाक मारू लागले. तेंव्हा तुळजाजीनेच आवाज दिला.

त्यांची आई आणि भाऊ त्यांच्या जवळ गेले आश्रुनयनांनी त्यांना नमस्कार केला. आईने व मी तुमचा खुप शोध घेतला. असे म्हणुन अर्जुनजी त्यांना घरी चालण्यास विनंती करू लागले आई सुध्दा तुळजाजीला भरल्या अंत:करणाने घरी चालण्यास सांगत होती. तुळजाजींनी त्यांना स्पष्ट सांगीतले मी आता तपश्चर्येला बसलो आहे. तप पूर्ण केल्याशिवाय मला बाहेर येता येणार नाही. तुम्ही माझी काळजी करू नका माझी वाट पहा. मी नक्कीच परत येईन . त्यानंतर आई आणि भाऊ घरी परत आले. दिवसा मागुन दिवस महिण्यामागून महिणे झाले. गमाईला चिंता वाटू लागली. त्याने काहीही खाल्ले पिले नाही. परंतु गमाईला प्रतिक्षा करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. वर्षा मागून वर्ष गेली. गमाईला राहवल्या गेले नाही. तिने लोकांना गोळा केले आपला मुलगा या बुरूजात आहे. त्याला बाहेर आणा अशी विनवू लागली. तेंव्हा लोकांना सुध्दा उत्सुकता लागली. ते विचार करू लागले सात वर्ष झाली खरंच हा तुळजाजी बुरूजात काय करत असावा. हे पाहण्यासाठी काही निवडक मंडळी बुरूजात प्रवेशली त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. तुळजाजी डोळे मिटून शांतपणे राम, कृष्ण, हरीचा जप करीत होते. मुंगुस आणि साप आपले वैरत्व विसरून त्यांच्या अंगा खांदयावर आनंदाने खेळत होती. हा चमत्कार सर्व लोक प्रत्यक्ष पहात होती. हया चमत्काराची बातमी वाच्यासारखी सगळीकडे पसरली. गावातील सर्व मंडळी हा चमत्कार पाहून गावोगावचे लोक हा चमत्कार सतत पाच वर्ष पाहत होते. तुळजाजीच्या तपाला तब्बल

बारा वर्ष पूर्ण झाले. हया कालावधीमध्ये त्यांचे अनेक भक्त झाले. त्या अंधार कोठडीत लोकांची गर्दी जमू लागली. लोक देवाच्या दर्शनाने सदगतीत होत दर्शन घेत. गावातील लोकांना आपल्या कृतीची लाज वाटायला लागली वेडा पिसा तुळजाजी आज लोकांचा देव झाला सर्वगावकरी मंडळी त्यांचे भक्त झाले. बारा वर्षाचे तप पुर्ण करून तुळजाजीने डोळे उघडले. भक्तांचा मेळा जमलेला त्यांच्या नजरेस पडला. भाविक भक्त बेधुंद होवून ओरडायला लागली मुंगसाजी महाराज की जय...ऽऽऽ!

तुळजाजीच्या अंगावार खांदयावर मुंगुस साप खेळत होती. हे पाहुन भाविक भक्तांनी त्यांचे नांव मुंगसाजी ठेवले.

मुंगसाजी माऊलीच्या दर्शनाला लोकांची रांग लागली. गमाईला ही वार्ता कळताचगमाई धावत पळत मुंगसाजी जवळ आली देवाला हृदयाशी कवटाळून माझा मुंगशा। माझा मुंगशा ।। म्हणुन ओरडू लागली. भगवंताचा साक्षात्कार झाला. भवानी देवीचे वचन खरे ठरले हे पाहून गमाईचे हृदय भरून आले. डोळयातील आसवांना तिने मोकळया करून दिल्या. तिने सुध्दा मुंगसाजी बरोबर प्रतिक्षेचे बारा वर्षाचे तप पूर्ण केले. अश्रूने देवाला जणू तिने अंघोळच घातली आणि देवाला घरी चालण्यास सांगीतले. बारा वर्ष तप केल्यामुळे त्यांच्या मांडया आणि पोटऱ्या एकमेकांना चिकटल्या होत्या. मुंगसाजी भगवंतानी आपल्या हातांनी मांडया आणि पोटर्याचे मास तोडायला सुरूवात केली. सर्वचभक्तगण हा दुःखमय प्रसंग पाहत होते. सर्व रक्तांनी

माखलेल्या अवस्थेत भगवंत उभे राहीले. त्यांच्या मांडया आणि पोटऱ्यातून भळाभळा रक्त सांडायला लागले परंतु भगवंतानी आई व्यतिरीक्त कोणालाही आपल्या अंगाला हात लावू दिला नाही. देवाला घरी नेवून भगवंताचे मंगल स्नान करण्यात आले. औषधोपचार करण्यासाठी आईवभक्तगन वैद्याला बोलावण्या – करीता गेले असता.

भगवंत मात्र भोवतालच्या परिसरात जावुन ताहनलेल्या गाईला पाणी पाजु लागले, त्याचे भक्तगन देवाचे हे रूप पाहून सुखावून गेले. मुंगसाजी मनोभावे सेवा करणाऱ्या प्रत्येक भक्ताला भगवंत प्रत्येक ठिकाणी जाणवायला लागले. गाव अगदी मुंगसाजी मय झाला धामणगावात साक्षात मुंगसाजीच्या रूपाने साक्षात विष्णु भगवंताने अवतार घेतला आहे. ही वार्ता सगळीकडेच वाऱ्यासारखी पसरली शेकडो भाविक भक्ताची धामणगांवाला रांग लागली येथे येणाच्या सर्व भाविक भक्तांना देव दर्शन देत असत. भजन किर्तन सुरू झाले धार्मिक वातावरनाने धामणगांव नगरी न्हावून निघाली.

भगवंताच्या चमत्काराचा महिमा सगळीकडे पसरू लागला तस तसे भक्ताची संख्या दिवसें दिवस वाढतच होती. धामणगांवी येताच मनाला शांती आणि समाधान मिळते.

धन्य धन्य ते गमाई नंदन श्री मुंगसाजी ।
धन्य त्यांची पंढरी धामणगांव (देव) नगरी ।।

# आईच्या आज्ञेचे पालन

मुंगसाजी महाराज आपल्या भक्तांसोबत नेहमी भटकत असायचे गावांत एका ठिकाणी मात्र त्यांच जास्त वास्तव्य असायचे. हे त्यांच्या भावाच्या लक्षात आले. त्यांनी एका सुताराला बोलावून घेतले. त्याला देवाच्या सिंहासनाकरीता बंगळी तयार करण्यास सांगीतले. त्याने आनंदाने ही कामगीरी स्विकारली. भगवंताचे सिंहासन बनवुन आपले जीवन सार्थक होईल या भावनेने त्याने अत्यंत कला कुसरीने बंगळीचे सिंहासन तयार केले आणि मुंगसाजी देवाच्या स्वाधिन केले. देवाच्या भावाने आणि भक्तजनांनी त्यांचे कौतुक केले. त्याला त्याचा मोबदला देण्यात आला परंतु त्याने तो भगवंताच्या पायावर ठेवला. भगवंत त्या बंगळीवर बसून मोठमोठयाने झोके घेवू लागले आणि आनंदाने 'लावण्या' म्हणत त्यावेळी सर्तभक्त भक्ती भावाने त्यांना लावण्या म्हणण्यास साथ देत असत. देव बंगळीवर बसायचे आणि तिथेच झोपत असे बंगळी चोवीस तास हलत असत. ती बंगळी मुंगसाजीच्या दरबारात आजही तशीच आहे.

देवाला सतत आपल्या भक्तांची काळजी असायची. भक्तांची दु:ख दुर करण्यासाठी रात्रदिवस भटकत असे. असेच एक दिवस भुक तहान विसरून देव भक्तांची दु:ख दुर करण्यात मग्न होते. त्यांची आई मात्र भगवंतासाठी जेवणाचे ताट तयार करून त्यांची वाट पाहत बसली होती. मध्यरात्र झाली तरीही भगवंताचा पत्ताच नाही. वाट पाहून गमाई थकली तिला झोप येवू लागली.

तरीही देवाची त्या वाट पाहत होत्या. तेवढयात भगवंत घरी आले आपल्या आईला जेवणाचे ताट वाढून मागू लागले. आई देवावर रागावली आईने देवाला ताट वाढून देण्यास नकार दिला देव मात्र जेवणासाठी हट्टच करू लागले. त्यावेळी आईने देवाला वचन मारगीतले. त्यावर देव आनंदाने म्हणाले " माग आई कोणते वचन पाहीजे ते आयुष्यभर पाळीण" त्यावर आई म्हणाली नाही तुला ते जीवंतपणी आणि मेल्यानंतर सुध्दा पाळावयाचे आहे. "त्यावर भगवंतानी आईला कोणते वचन पाहिजे असे विचारले देवाला आईने सांगीतले दिवसा तु कुठेही फिरत रहा परंतु रात्री मात्र तु मला बंगळी वरच पाहिजे. देवांनी आईला वचन दिले. देवाने ते आयुष्यभर तर पाळलेच आणि मृत्युनंतर सुध्दा पाळले. कारण आजही बंगळी खाली देव झोपल्याच्या आकाराची मुर्ती आहे."

देव बंगळीवर झोके घेत असतांना त्यांचे भक्त रामजी माळी ह्यांना धामणगांवा विषयी विचारले. मुंगसाजी महाराज क्षणभर शांत झाले. आणि म्हणाले "आधी आघाडे धोतरे वाढविन आणि नंतर धामणगांवाला पंढरी करीन" असे म्हणुन मुंगसाजी देव झोपी गेले.

वर्षा मागून वर्ष गेली आईला दिलेले वचन देवांनी हयात असे पर्यंत तर पाळलेच परंतु मृत्युनंतरसुध्दा पाळले. आजही बंगळीच्या खाली झोपलेल्या अवस्थेत भगवंताची मुर्ती प्रत्यक्ष देवाने उभारून धामणगांवात त्यांचे अस्तित्व कायम केले. आजही भक्तांना त्या मुर्तीचे दर्शनाने प्रत्यक्ष भगवंताचे दर्शन होते. हे दृश्य पाहून भाविक भक्त सदगतीत होवून पुन्हा पुन्हा नतमस्तक होतात.

मुंगसाजी देवाची अगाध लिला प्रत्यक्ष डोळयांनी पाहिल्यावर जिवनाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. धामणगांवामध्ये सर्वत्र भगवंताच्या नावाचा जयजयकार दुमदुमत आहे. त्यांच्या किर्ती ,महिमा सर्व भक्त गात आहेत.

## भगवंताचे चमत्कार

अठराशे नव्वद मध्ये मुंगसाजी महाराज असेच एकदा सकाळी मि रत होते. हयावेळी त्यांचे वय झाले होते. ते थकले होते. ते लक्ष्मण धोब्याला पाणी मागू लागले. त्याला देवाचा राग आला देवाकडे पाहून तो थुंकला एक शिवी हासडली आणि आपल्या जवळील पाणी फेकून दिले देवाला राग आला. देव थोडे दुर गेले. जमीन साफ केली आणि जमीनीला तोंड लावून पाण्याच्या गुरळया धोब्याकडे फेकू लागले धोब्याला आश्चर्य वाटले. भगवंत तिथून निघून गेले. धोब्याने त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता त्याला ती जागा ओली असल्याचे जाणवले . तेव्हा त्याने दोन्ही हात जोडून नमस्कार केला लोकांना बोलावले आणि सांगीतले अरे हा मुंगशा वेडा तो मुंगसाजी भगवंत आहे असे सांगू लागला. धोब्याचा कर्मठपना जावून त्याची जागा भक्तीने घेतली. देवाचे गुणगाण व सेवेत त्याने आपले आयुष्य घालवले गावातील काही खोडकर कर्मठ लोक मात्र अजुनही त्यांचा छळ करीत. त्यांच्या विरूध्द भडकविण्याचा प्रयत्न करत परंतु हया गोष्टीचा लोकांवर उलट परिणाम झाला. भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. देवाची महिमा प्रत्येक माणूस सांगू लागला तसतसे हया लोकांना

देवाचा अत्याधिक राग येत असे ऐके दिवशी गावातील आकाराम नावाच्या व्यक्तीने देवाला विष देवून मारून टाकण्याचा कटरचला तो स्वत: पेलाभर विष घेवून देवाच्या दरबारात गेला परंतु त्याचे हातपाय थरथर कापायला लागले. देवाने आकारामला जवळ बोलावले आणि विचारले तु माझ्यासाठी काय आणले. त्यावर आकाराम काहीच बोलला नाही. तेव्हा देवाने त्याच्या हातातील पेला घेतला त्याच्या हातातील पेला घेतला आणि त्यातील विष घटाघटा पिवून टाकले. त्यानंतर भगवंत तीन दिवस झोपुनच राहीले. आकारामला आनंद झाला. त्याला वाटले की मुंगशा मेला तो मोठया आनंदाने मुंगसाजी जवळ गेला. देव उठून बसले आणि म्हणाले ''कारे, आज नाही आणला का रे पेला'' आकारामला आपल्या कृत्याची लाज वाटली देवाच्या पायावर मस्तक ठेवून देवाची क्षमा मारगीतली आकारामने झालेल्या घटनेची हकीकत लोकांना सांगीतली . देवाच्या भक्तांनी हा देवाचाच चमत्कार आहे. म्हणून देवाचा जयजयकार केला.

देवाची अगाध लिला सर्वत्र पसरली होती. देवावर सर्वांची श्रध्दा होती. एकदा एक मुलगी मरण पावली म्हणुन तिचे आई वडील जोरजोराने रडू लागले. देवाचा भक्त रामजी माळी याला ही गोष्ट समजली त्यांनी त्या मुलीला देवाजवळ आणले. मुलगी निपचीत पडली होती. तिच्या आईला देवाने विचारले ''काय झाले तुमच्या मुलीला ? तिचे आई वडील आणखीनच जोरात रडू लागले तेंव्हा भगवंताने मुलीच्या हाताला धरले आणि म्हणाले ऐ पोरी, तुझी झोप झालीच नाही का ? चल उठ'' त्या सरसी मुलगी उठून

बसली. हा चमत्कार पाहून लोक मंत्रमुग्ध झाले. भगवंताचे सारेच जण कौतुक करू लागले.

देवाची किर्ती गावोगावी पसरली सावरगावच्या पाटलाच्या म्हशी दोन वर्षा पासून हरवल्या होत्या. पाटलाने म्हशीचा शोध सगळीकडे घेतला पण त्याला म्हशीचा शोध लागला नाही. लोकांच्या सांगण्यावरून तो मुंगसाजी देवाच्या दरबारात आला. परंतु देवाला पाहून त्याची निराशाच झाली त्याला वाटले हा काय आपल्याला म्हशीचा पत्ता सांगणार ! पण इथपर्यंत आलोच आहे. तर विचाराव म्हणुन त्याने विचारल असता देवाने सांगीतले आताच तुझ्या घरी मी म्हशी बांधून आलो परंतु पाटलाला त्यांचे बोलणे वेडयासारखे वाटले ते तसेच घरी परतले. खरंच घरी म्हशी बांधलेल्या होत्या. सगळयांनी म्हशी घरीच आल्याची बातमी पाटलाला दिली. पाटलांनी देवाचे आभार मानले. तिथुन देवाला दंडवत घातला. त्वरीत धामणगांवाला जावून देवाच्या नावाने शंभर लोकांना पुरणपोळीच जेवण दिलं.

अशा प्रकारे देव आपल्या भक्ताच्या मदतीला नेहमी धावून जात असे. त्यांची सतत भक्तावर कृपा दृष्टी असायची अनेक भक्तांना देवाने आपल्या स्वप्नात तर काहींना प्रत्यक्ष दर्शन दिल्याचे सांगीतले आहे. भगवंताच्या मंत्राचा जप करणाच्या भक्ताला मुंगसाजी दर्शन देतात. असे ऐकीवात आहे. असे अनुभवही पुष्कळ भाविक भक्तांनी अनुभवले आहेत.

# मुंगसाजीने श्री. शंकर दर्शन घडविले

अठराशे सत्याण्णव मध्ये मुंगसाजी भगवंत रानात भटकत असतांना त्यांना वीस पंचविस गायी पाण्यावाचून तहानेने व्याकुळ होवून एका विहीरी भोवती गरगर फिरत होत्या भगवंताला त्याची दया आली. भगवंत विहीरीजवळ असलेला दोर पोहरा घेवून विहीरीतुन पाणी काढायला लागले. आणि गाईना पाणी पाजण्यास सुरूवात केली. गायींना खूप तहान लागली होती त्यांना पाणी पाजता पाजता देवाची घाणाघाण झाली. पाणी काढून काढून त्यांचे हात लाल झाले. तरीही गायींची तहान भागल्या शिवाय भगवंताने पोहरा खाली ठेवला नाही गायींना पाणी पाजून देव घरी आले. त्याच दिवसापासून भगवंत आजारी पडले. हकीम वैद्यांना आणले. औषधपाणी झाले परंतु देवाचा आजार कमी होण्या अभावी वाढतच गेला. कोणताही वैद्य देवाला बरे करू शकला नाही . आईंना देवाची चिंता वाटू लागली त्यांनी देवीचे नामस्मरण सुरू केले. दानधर्म, पुजाअ्चा सुरूवात केली दारावर आलेल्या प्रत्येक साधुसंताला रिकाम्या हातांनी वापस जावू दिले नाही.

असाच एक साधू दारावर येवून ठेपला आणि तो जेवण मागू लागला घरामध्ये स्वंयपाक नव्हता. विक्रमजीला वाईट वाटले. त्यांनी गमाईला सांगीतले. गमाईने त्या साधु पुरूषाला थोडं थांबायला सांगीतलं. लवकरच जेवण तयार झालं. गमाई आणि

विक्रमजी त्या साधूला जेवणास विनंती करू लागले. साधूने मात्र भगवंतास जेवण्यास चलण्यास सांगीतले. भगवंत मनोमनी खूष झाले. त्यांचा आजार पळाला. गमाईने तिघांना जेवायला वाढले सर्व भरपूर जेवण करून उठले तेंव्हा मुंगसाजीनी आपल्या आईवडीलांना साधूचा परिचय करून दिला. प्रत्यक्ष भगवान शंकर आपल्या दर्शनाला आले आहे असे सांगीतले विक्रमजी आणि गमाई ने भगवान शंकराच्या पायावर मस्तक टेकले आपल जीवन भगवंत मुंगसाजीमूळे सार्थक झाल्याचे समाधान झाले. तेवढयात भगवान शंकर अंतर्धान पावले. भगवान मुंगसाजी आजारातून पुर्णपणे बरे झाले आई वडीलांना देवाचा चमत्कार कळला. आजाराचे सोंग घेवून प्रत्यक्ष शंकराला देवांनी भेटीस आणले हयामुळे विक्रमजी आणि गमाईला स्वर्गीय सुखाचा आनंद मिळाला.

देवाचा आजार बरा झाला म्हणून सर्व भाविक भक्तांना आनंद झाला सर्वांना गावभर साखर वाटली गमाई आणि विक्रमजीने. तिथल्याभूमीला शतकोटी प्रणाम केले. कारण हया भूमीत भगवान शंकराचे दर्शन झाले धामणगांव भूमी पावन स्पर्शनि धन्य झाली.

# तुकडोजीची सालबर्डीचा यज्ञ

संत तुकडोजी महाराज समाज सेवेचे व्रत मनोभावे – चालवत होते. गावोगाव जावून लोकांना ग्रामगितेचे ज्ञान देत असत. सत्यधर्म कोणता यांचा उपदेश करत असे. धर्म प्रसाराचे काम करत असतांना ते अमरावती जिल्हातील सालबर्डी येथे आले असता बिना विस्तवाने यज्ञ पेटवायचा निर्धार जाहीर केला. ही वार्ता सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. महाराष्ट्रातील सर्व कानाकोपऱ्यातून लोक बिना विस्तवाचा यज्ञ पाहण्यासाठी जमले. सर्व संत सुध्दा तेथे गोळा झाले. सर्वांना यज्ञ पाहण्याची उत्सुकता लागली. अमरावतीची काही भक्त मंडळी धामणगांवी आली होती. त्यांनी धामगांवच्या भाविक भक्तांना ही गोष्ट सांगीतली. परंतु इतर संताप्रमाणे मुंगसाजी देवाला यज्ञाचे निमंत्रण आले नव्हते. परंतु आग्रहाखातर देव बिना विस्तवाने यज्ञ कसा पेटतो हे पाहण्यासाठी सालबर्डीत आले. परंतु तिथे त्यांना कोणीही ओळखले नाही आणि त्यांच्याकडे कुणी लक्षही दिले नाही. तिथे जमलेल्या बत्तीस संताची मात्र सर्वजन खबरदारी घेवू लागले त्याची सेवा करण्यात मग्न होवून गेले. मुंगसाजीला कोणी आसरासुध्दा दिला नाही. त्यांचे भक्त तिथे होते. त्यांनी देवाला घरी नेले. पण देवाच्या भक्तांना यांचा राग आला. त्यांनी यज्ञ पाहायचे नाही. असे ठरविले देवाची आज्ञा घेण्यास ही मंडळी गेली आणि भगवंताला सुध्दा धामणगांवी परत चालण्यास विनंती करू लागले परंतु यज्ञ पाहून जाऊ या असे सांगीतल्यावर भक्तांचा राग शांत झाला. त्यावेळी रात्रीचे तीन वाजले होते. सर्वत्र उत्सुकता वाढत होती. यज्ञ बिना विस्तवाने

पेटण्याचा चमत्कार लोकांना पहावयास मिळणार होता सुर्योदय होताच भजन किर्तनाला सुरूवात झाली. सर्व भाविकांनी संताना मंगलस्नान घातले. यज्ञाची तयारी झाली. सर्व भाविकांनी महाराजाकडे त्यांच्या भक्ताशिवाय कोणीही लक्ष दिले नाही. भक्तांनी देवाचे मंगल स्नान घातले. कपडे चढविले. यज्ञाची वेळ झाली सर्व संत आसनस्थ झाली. सर्व संताच्या मागे भगवंत मुंगसाजी उभे होते. त्याचा क्रमांक तेहतीसावा होता. संत तुकडोजींनी यज्ञाची रूपरेषा सर्व संत मंडळी व तिथे जमलेल्या लाखो लोकांसमोर मांडली. हे यज्ञ जो संत बिना विस्तवाने पेटविल तोच खरा संत असे सांगुन यज्ञ पेटविण्याची सुरूवात झाली भाविक भक्तांनी यज्ञ पेटविण्यास विनंती केली त्याप्रमाणे एक संत आला यज्ञाला प्रदक्षिणा घातली मंत्रोपचार केला परंतु यज्ञ पेटला नाही . दुसराही संत आपला प्रताप दाखवू शकला नाही हया प्रमाणे एकामागुन एक असे सर्व संत संपले. त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा केली पण यज्ञ पेटविण्याचे सामर्थ्य कोणीही सिध्द करू शकले नाही, संत तुकडोजी ना काळजी पडली आपला यज्ञ कसा आणि कोणी पेटवणार की नाही त्यानंतर त्याच्या नजरेस मुंगसाजी पडले. परंतु आपण यांना निमंत्रण दिले नाही आणि त्यांच्याकडे लक्षही दिले नाही. तेंव्हा त्यांना कसे बोलवावे या विचाराने ते थोडे नरमले. तरीपण मुंगसाजींना यज्ञ पेटवण्यास विनंती करण्यात आली. तेंव्हा भगवंत चिडले तुकडोजीला म्हटले "अरे एवढे संत आले पण एकही यज्ञ पेटवू शकले नाही. असले कितीतरी संत माझ्या दावणीला बांधले आहे!" असे म्हणुन यज्ञाकडे चालू लागले.

यज्ञाजवळ गेल्यावर त्यांनी आजुबाजुला नजर फिरविली यज्ञाची पुजा करून साष्टांग नमस्कार केला. त्यानंतर यज्ञाला प्रदक्षणा घालू लागले. पाच प्रदक्षणा पूर्ण झाल्यावर मुंगसाजी देवाने यज्ञामध्ये लघवी केली. त्याबरोबर यज्ञ धडधड पेटू लागला. भगवंताचा हा चमत्कार पाहून जमलेली मंडळी मुंगसाजी देवाचा जयजयकार करू लागली. मुंगसाजी माऊलीच्या जयघोषाने सारा आसमंत दुमदुमून गेला.

सर्व संतानी देवाचे आभार मानले. तुकडोजी महाराजाला अत्यंत आनंद झाला खऱ्या संताचा परिचय झाला. तुकडोजी महाराज त्यांचे भक्त झाले. त्यांचे नामस्मरण करू लागले लोकांनी देवावर गुलाल उधळला गुलालाचा अक्षरक्षः गुडघ्याएवढा ढिग झाला मुंगसाजी माऊलीचे नाव घेवून सर्व लोक बेधुंद नाचू लागले. संत तुकडोजी महाराज समोर आले. त्यांनी देवाची पुजा केली त्यांना मोठा हार घातला. साक्षात परमेश्वराला तुकडोजीनी यज्ञ पेटवितांना पाहिले त्यांना आपले गुरू मानले . त्यांच्या चरणी आपले मस्तक ठेवले . भगवंताना पालखीतुन मिरविण्यात आले. सर्व लोकांनी देवाचे दर्शन घेतले . सर्व लोक यज्ञाकडे पाहून पुन्हा पुन्हा देवाला मनोमन नमस्कार करू लागले. तुकडोजींनी गावोगावी भगवंताच्या महिमा लोकांना ऐकविल्या ही वार्ता लवकरच संपुर्ण महाराष्ट्रात पसरली कानाकोपऱ्यातून देवाच्या दर्शनाला लोक धामणगांवी येवू लागले धामणगावातील सर्वच लाकांना देवाचा अभिमान वाटू लागला. तेंव्हापासुन धामणगांवी भाविकांची एकच गर्दी जमु लागली.

# मुंगसाजी देवाने प्रेताला उठविले

मुंगसाजी आपल्या भक्तांच्या मेळ्यात बसले होते त्यावेळी मानोरा तालुक्यातील रामराव मारवाडी आपले दु:ख घेवून देवाजवळ आला. त्याने देवाला नवस कबुल केला. जर माझ्या मुलाला बरे केले तर मी धामणगांव नगरीला जेवन देईल असे सांगीतले देवाने त्याचे म्हणने ऐकून घेतले. त्यानंतर देवाने सांगीतले घरी जा तुझा मुलगा अगदी ठणठणीत आहे. मारवाडी घरी आला त्याने पाहिले की आपला मुलगा आनंदाने जेवन करत बसला आहे. त्याला फार आनंद झाला. तेथूनच देवाला दोन्ही हात जोडून नमस्कार केला. त्याने आपल्या पत्नीला देवाचा महीमा सांगीतला. त्याने पत्नीला आपण देवाला नवस कबुल केला म्हणुन सांगीतले हा नवस आपण पुढल्या वर्षी फेडू असे सांगीतले एक वर्ष उलटल होत मारवाडी आपला नवस विसरून गेला. असेच वर्षामागुन वर्षगेले. बारावर्ष झाले परंतुमारवाडयाने नवस मे डला नाही. त्याला त्याचा विसर पडला. त्याला देवाची सुध्दा आठवण झाली नाही.

पुन्हा त्याचा मुलगा आजारी पडला चांगल्या डॉक्टरांनी त्याचा इलाज केला पण सर्व निष्प्रभ ठरले. त्याचा आजार बरा झाला नाही. त्यामुळे त्या मुलाचे निधन झाले. मारवाडयाला एकदम मुंगसाजीची आठवण झाली त्यानंतर तो देवाचा धावा करू लागला मरण पावलेल्या मुलाला घेवून तो धामणगांवी आला त्यावेळी भगवंत इतरत्र भक्तांच्या सेवेत लीन होते. मारवाडी

दरबारात आला तिथे भक्तगण देवाचे नामस्मरण करत बसले होते. मेलेल्या मुलाला बंगळीजवळ जमीनीवर झोपवून हात जोडून देवाची क्षमा मागू लागला चुक झाली देवा म्हणुन रडू लागला. या नंतर असे होणार नाही असे म्हणुन क्षमेची याचना करू लागला तेवढयात भगवंत आपल्या भक्तासह दरबारात आले बंगळीवर बसले मारवाडयाने देवाचे पाय धरले झालेला प्रसंग देवाला सांगीतला देव बोलु लागले ''मुंगसाजी देणे कुणाला चुकत नाही. जो कोणी खाईल त्यालाही सोडणार नाही मग तो आकाशात गेला तर सुतळी लावीन जमीनीत गेला तर कुदळ लावीन तरी मुंगशा त्याले सोडणार नाही. मारवाडी देवाचे पाय धरून आपल्या मुलाला जीवंत करण्यास विनवू लागला. तुमचे देणे मी आताच्या आता देतो. असे कबुल करू लागला. तेंव्हा देवाने भजन म्हणणाच्या मंडळींना भजन मोठयाने म्हणावयास सांगीतले दरबारात खुप गर्दी जमली होती देव बंगळीवर मोठमोठयाने झोके घेवू लागले अचानक झोका थांबवून मुंगसाजी देव मेलेल्या मुलाजवळ गेले आणि म्हणाले , ''अरे झोपलास काय ! उठ, भजन कर !'' हे ऐकताच मुलगा उठून बसला भजन करू लागला तिथे जमलेल्या सर्व भक्तांनी देवाचा जयजयकार केला.

मारवाडी देवाच्या आज्ञेने घरी गेला आणि पाच दिवसात गावाला भोजन देण्याच्या तयारीने आला. गावातील सर्व थोरामोठयांना आग्रहाने जेवू घातले. देवाला सुध्दा त्यांनी जेवू घातले आनंदाने तो आपल्या गावी गेला. त्यानंतर दरवर्षी आपल्या यथा शक्ती दान – धर्म भजन – पुजन करायचा त्यानंतर तो देवाला

कधीही विसरला नाही.

देवाची अगाध लिला सर्व भक्तांना प्रत्यक्ष डोळांनी पहायला मिळाली. त्यांच्या दर्शनाने आपला जन्म सार्थक झाल्याचे त्यांना समाधान मिळालं.

# मुंगस्याचे बोल

“ मुंगस्याचे बोल, पृथ्वीचे मोल ”

“ मुंगस्याचा शिक्का, धाक ब्रम्हाधिका ”

“ पुन्हा पुन्हा मी येणारा नव्हे रे । ”

मी अंधार पडल्यावरच येत असतो. ”

“ देव देव काय करता बे ।
देव मुंगस्याच्या दावनीला बांधले आहेत ”

“ मुंगस्या मुंगस्या म्हणता, आगीत उडी टाकली
तरी केसाला धक्का लागु देणार नाही. ”

“ मुंगस्याचा हात – जगन्नाथ ”

“ पुंढरपुरचा विठोबा, तो मीच ”

“ तु पहा माझ्याकडे, मी पाहतो तुझ्याकडे ”

“ कुणी ना मोठा, ना कुणी लहान ”

– भगवान मुंगसाजी माऊली